**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN(o): 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 6.831
Volume - 7, Issue - 05, May - 2024

DOIs:10.2018/SS/202405006 --:-- Research Paper / Article / Review

# शैक्षणिक नेतृत्व – नवे आयाम

**घेवरीकर उमेश गोपीनाथ ( बी. एस्सी. बी. एड)**
पर्यवेक्षक , बाळासाहेब भारदे हायस्कुल शेवगाव जि अहमदनगर (महाराष्ट्र) भारत
Email - umesh.ghevarikar@gmail.com,

***सारांश :*** शिक्षण शेत्रातील वेगवान बदलांना सामोरे जाताना शिक्षण शेत्राचे नेतृत्व करू पाहणाऱ्या व्यक्तीला शेक्षणिक नेतृत्वाच्या पारंपारिक संकल्पना आधुनिक आयामांची जोड द्यावी लागणार आहे. जुन्या काळातील शिक्षण क्षेत्र व सध्याचे शिक्षण क्षेत्र यात कमालीचे बदल झालेले आहेत. कोरोना काळात अचानक आलेल्या संकटामुळे online शिक्षण पद्धतीला सामोरे जावे लागणे हेत्याचे उत्तम उदाहरण आहे. याशिवाय डिजिटल क्रांती, माहितीचा अधिकार, शिक्षण विषयक बदलते कायदे, पालकांची बदलती मानसिकता, इंग्रजी माध्यमातून शिकण्याचे वाढते आकर्षण, मुलांच्या हातात नेट व मोबाईल आल्याने निर्माण होत असलेल्या मानसिक व भावनिक समस्या असे अनेक प्रश्न लक्षात घेता यापुढे शैक्षणिक नेतृत्वाला समुपदेशकाची भूमिका पारपाडावी लागणार आहे. या सर्व बाबींचा आढावा या संशोधनाच्या माध्यमातून गग घेतलेला असून नुसत्या समस्या न मांडता त्यावरील उपाय योजना यांचा देखील विचार यात करण्यात आला आहे.

***महत्वपूर्ण शब्द :*** शैक्षणिक नेतृत्व. नवे आयाम. वेगवान बदल . कायदे. नवेराष्ट्रीय शिक्षण धोरण. डिजिटल शिक्षण . बदलती भूमिका . मराठी व इंगजी माध्यम. भावनिक व मानसिक बदल. पालकांची भूमिका. शैक्षणिक समुपदेशक . लवचिकता. उपाय आणि समस्या .

## 1. प्रस्तावना :

'नेतृत्व म्हणजे व्यक्तीची दृष्टी व अभिव्यक्ति उंचवण्याची आणि त्याचे व्यक्तिमत्त्व विकसित करण्याची प्रक्रिया होय', असे पीटर डरक यांनी म्हटले आहे तर मेसन यांच्या मते , 'नेतृत्व म्हणजे अशी क्षमता जिच्या योगे व्यक्ती आणि समूह दोन्हींचा प्रभावित होऊन व्यक्ती आणि संस्था अशा दोन्हींचा विकास साधला जातो'.

शालेय नेतृत्व या संकल्पनेचा विचार करताना आता पारंपरिक पद्धतीने न करता शिक्षणात होऊ घातलेले आणि होत असलेले वेगवान बदल विचारात घेणे अत्यावश्यक ठरणार आहे.या नव्या दृष्टिकोनातून शालेय नेतृत्व या संकल्पनेचा विचार होणे महत्वाचे आणि गरजेचे ठरणार आहे. अन्यथा शालेय नेतृत्वाच्या अस्तित्वावर गंभीर प्रश्न उभे राहू शकतात.

शाळा म्हटले की सर्वांच्या नजरेसमोर एक विशिष्ट चित्र उभे रहात असे. या चित्राच्या चौकटीला छेद देणारे अनेक बदल शिक्षण क्षेत्रात झपाट्याने झाले, होत आहेत.

एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर येऊ घातलेल्या शैक्षणिक, सामाजिक,सांस्कृतिक, अध्यात्मिक, राजकीय, नैतिक, भावनिक आणि मानसिक बदलांचे प्रतिबिंब शिक्षणावर पडते आहे. यात शिक्षणाचे संगणकीकरण, समाज माध्यमांचा प्रभाव, झपाट्याने बदलत असलेली नीतीमूल्ये, नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण , राज्यकर्त्यांचा शिक्षणाकडे पाहण्याचा बदलता दृष्टिकोण, मराठी आणि इंग्रजी माध्यमाविषयी पालकांची संभ्रमावस्था अशा अनेक पैलूंचा समावेश आहे.

कोरोंना महामारीमुळे शिक्षणक्षेत्राला अत्यंत कमी कालावधीत अत्यंत अपरिचित शिक्षण पद्धतीला म्हणजे 'ऑनलाइन' शिक्षण पद्धतीला सामोरे जावे लागले. याअचानक उद्भवलेल्या संकटाशी जुळवून घेतानाएकूणच शिक्षक व शैक्षणिक नेतृत्वाची कसोटी लागली. माहितीचा महास्फोट आणि कोरोंना काळापर्यन्त मुलांच्या हातातून कटाक्षाने दूर ठेवला जाणारा मोबाईल अचानक त्यांचा शिक्षणदूत बनला आणि त्यांनंतर शाळा "ऑफलाइन" पद्धतीने सुरू

झाल्यानंतरही तो त्यांच्या हातात कायम राहिला. त्यामुळे मुलांच्या शिक्षणावर ,वर्तनावर,मानसिकतेवर,भावनिकतेवर होत असलेल्या परिणामांनी शैक्षणिक नेतृत्व पूढे गंभीर प्रश्न उभे राहिले आहेत.
या सर्व गोष्टींचा विचार करता शैक्षणिक नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीला स्वत:मध्ये कालसुसंगत बदल करणे अगत्याचे ठरते.

## २. साहित्य पुनरावलोकन :

### मुद्दा १ - प्रशासकीय यंत्रणेतील बदलती भूमिका

शैक्षणिक स्तरावर कालपर्यंत वापरली जाणारी पर्यवेक्षण पद्धती ही लेखी नोंदी,शालेय अभिलेखे तपासणी, शेरेबुक,प्रत्यक्ष शाळा भेटी, मीटिंग कार्यशाळा अश्या स्वरूपाची होती. गेल्या काही वर्षात त्याची जागा झूम मिटिंग्स, ऑनलाइन माहिती भरणे, व्हीसी , गूगल फॉर्म्स , यांनी घेतली आहे. कोरोंना काळात तर वर्ग अध्यापन आणि इतर कामे सुद्धा झूम किंवा गूगलमिट यांच्या माध्यमातून होत होती. प्रशासनाला द्यायची माहिती आता ऑनलाइन पद्धतीने भरावी लागते. या सगळ्यांसाठी शैक्षणिक नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीला या सगळी डिजिटल माध्यमांचा वापर शिकून घेणे, त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या बदलांची माहिती ठेवणे आणि त्यांच्या वापरांमध्ये असणारे धोके, बारकावे, अडचणी व त्यावरील उपाय शिकून घेणे अत्यावश्यक झाले आहे. शिवाय या सगळ्यात सहकारी शिक्षक ,इतर कर्मचारी इतकेच नव्हे तर अगदी चतुर्थ श्रेणी कर्मचारी सुद्धा प्राविण्य कसे मिळवतील याकडे लक्ष देत आपले, त्यांचे व शाळेचे कोणतेही काम केवळ संगणक असाक्षरते मुळे अडणार नाही याची दक्षता घेणे अगत्याचे आहे. इथे त्याच्यातील नेतृत्व गुणांचा खरं कस लागणार आहे. कोणत्याही नव्या गोष्टींचा स्वीकार पटकन होत नाही,आधी विरोध नंतर उपहास आणि त्यानंतर स्वीकार या पायऱ्यांमधून त्याला जावे लागते. शिवाय निवृत्ती जवळ आलेले सहकारी याला विरोध करण्याची शक्यता असू शकते. काही व्यक्तींचा मुळातच तत्वा : या प्रक्रियेला विरोध असू शकतो. या सर्वांना एकाच पद्धतीने समजाऊन सांगणे शक्य नसेल अशावेळी नेतृत्वाला कल्पकता वापरुन, दैनंदिन व्यवहारात या माध्यमांचा होणारा उपयोग, वापर न करता आल्यास होऊ शकणारे आर्थिक नुकसान व नवनवे ज्ञान आत्मसात करण्याचे फायदे समजाऊन देत त्यांची मानसिकता अनुकूल करावी लागेल.

### मुद्दा २--- शिक्षणातील नव्या अध्यापन पद्धती

अध्ययन अध्यापन पद्धतीमध्ये होत असेलेले बदल नेतृत्वाने आत्मसात केले तरच त्याचे फायदे तोटे ते इतरांसमोर मांडू शकतील. सुधारणेची सुरुवात स्वत: पासून करावी हे तत्व येथे तत्व: लागू होते. पूर्वीची साचेबद्ध शिक्षण पद्धती आता कालबाह्य ठरत आहे. तिची जागा आता ज्ञानरचनावादी पद्धतीने घेतली आहे. मुलांना शिकवू नये तर शिकण्यासाठी अनुकूल वातावरण त्यांच्या सभोवती निर्माण करून देणे हे शिक्षकाचे काम झाले आहे. शिक्षण विषयक कायदे झपाट्याने बदलत आहेत.मराठी माध्यम विरुद्ध इंग्रजी माध्यम असा लढा उभारला जात असून त्यामधून मराठी शाळांच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उभे रहात आहे.

पीयर आणि ग्रुप लर्निंग, कन्सेप्ट बेस लर्निंग, फील्ड विजिट , होम स्कूलिंग अशा नवनव्या संकल्पना उदयास येत आहेत. डिजिटल बोर्ड,प्रोजेक्टर आणि एआय यांचा मोठा प्रभाव शिक्षणावर पडतो आहे. केरळ मधील एका शाळेत तर अध्यापनाचे काम मानवी शिक्षका ऐवजी चक्क ए.आय टीचरच्या माध्यमातून करून पाहण्याचा प्रयोग झाला आहे.हे सारे आज प्रायोगिक पातळीवर असले तरी भविष्यात काय होऊ शकते ? याची ही नांदी ठरू शकते

या सर्व आव्हानावर मात करत आपली संस्था, शाळा आणि स्वत:चे अस्तित्व टिकवण्यासाठी शैक्षणिक नेतृत्वाला एकाच वेळी किती आघाड्यांवर लढायचे आहे याची कल्पना यातून येते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार आता पूर्व प्राथमिक ते पदव्युत्तर शिक्षणाच्या रचनेमध्ये मोठे बदल होणार आहेत. या बदलांची माहिती करून घेत आपल्या सहकारी शिक्षकांसोबत त्यावर सतत चर्चा करत त्यांना कार्यशाळा,मार्गदर्शन शिबिरे यांच्या माध्यमातून नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणबद्दल जागरूक ठेवणे हे काम शैक्षणिक नेतृत्वाला प्राधान्याने करायचे आहे. केवळ शिक्षकच नव्हे तर पालक आणि विद्यार्थी यांच्यापर्यन्त हे येऊ घातलेले शिक्षणिक बदल पोचवण्याचे काम त्याला करावे लागणार आहे.

## मुद्दा ३-- विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि भावनिक आरोग्याचा विचार

पूर्वी छडी लागे छम छम असा जमाना होता. त्या काळात मुलांचे मानसिक आरोग्य , भावनिक आरोग्य, भावनांक अशा संकल्पनांचा बोलबाला झालेला नव्हता. अलीकडच्या काळात मात्र शिक्षणात मानसिक आणि भावनिक आरोग्याचा विचार प्राधान्याने केला जात आहे. मुलांचे मानसिक आरोग्य व्यवस्थित नसेल, त्याला काही भावनिक मानसिक समस्या असतील तर त्याच्या अध्ययनावर विपरीत परिणाम होऊ शकतात प्रसंगी त्याचे शिक्षण बंद होऊ शकते यावर गांभीर्याने विचार केला जात आहे. मुलांच्या पालकांचा आर्थिक. सामाजिक स्तर यावर लक्ष देत मुलांच्या मानसिक समस्या सोडवण्याचा आणि त्याला आनंदी ठेवत त्याचे शिक्षण उत्तम रीतीने पूर्ण करण्याकडे लक्ष दिले जात आहे.

व्यसनाधीनता, दारिद्य, असाक्षरता, अंधश्रद्धा अशा अनेक बाबींचा मानसिक आणि भावनिक आरोग्यावर परिमाण होत असल्याने हा घटक व्यामिश्र स्वरूपाचा आहे. त्याची व्याप्ती अधिक आहे. यासाठी शैक्षणिक नेतृत्वाला मानसिक आरोग्य क्षेत्रात काम करत असेलल्या सेवाभावी संस्था उदा. मुक्तांगण,पुणे, आयपीएच, ठाणे, स्नेहालय , नगर यांची तसेच प्रशिक्षित समुपदेशक उदा. डॉ. आनंद नाडकर्णी, मुक्ता पुणतांबेकर , मुक्ता चैतन्य, गिरीश कुलकर्णी, श्रुती पानसे यांच्या कार्यशाळा, प्रशिक्षणे यांचे आयोजन करणे अशा बाबी गरजेच्या ठरणार आहेत, शासकीय स्तरावर वेळोवेळी या विषयावर घेतल्या जाणाऱ्या प्रशिक्षणे व कार्यशाळा यांचा उपयोग सहकाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी करून घ्यावा लागणार आहे .

आजच्या आधुनिक काळात इंटरनेट व समाज माध्यमे विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय ठरत आहेत. त्यांच्या चुकीच्या वापरामुळे सुद्धा अनेक सामाजिक प्रश्न उभे रहात आहेत. काही गेम्सच्या आहारी जाऊन मुले आत्महत्येला प्रवृत्त होत आहेत तर काही वेळा फिशिंग लिंक, मेसेजेस, डीपफेक यामुळे मानसिक विकार आणि समस्या यात वाढ होताना दिसते आहे. त्यासाठी सायबर जागरूकता सायबर सुरक्षा व सायबर कायदे यावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांना देत राहणे आवश्यक ठरते आहे.

## मुद्दा ४ --- कायदे विषयक नवे बदल

शिक्षणक्षेत्र हे फक्त विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यापुरते मर्यादित राहिलेले नसून समाज आणि शासकीय धोरणे यांचा मोठा प्रभाव आता शिक्षण क्षेत्रावर होतो आहे.बाल मजुरी, बाल विवाह, शालाबाह्य विद्यार्थी, व्यसने, शिक्षण विषयक कायदे, संगणक युग,सायबर गुन्हेगारी, बदलते सामाजिक आयाम, विविध सामाजिक आंदोलने आणि त्यांचा परिपाक म्हणून होत असलेल्या कायदेविषयक बदलांचा वेग प्रचंड आहे. त्या कायद्यांची सुयोग्य अंमलबजावणी हे शैक्षणिक नेतृत्वपूढील नवे आव्हान बनले आहे. त्या पैकी काही महत्वपूर्ण कायदे पुढील प्रमाणे आहेत.

1 शिक्षण हक्क कायदा -२००९
2 बाल मजुरी प्रतिबंधक कायदा-१९८६
3 बाल विवाह विरोधी कायदा -२००६
4 सायबर गुन्हेगारी विषयक कायदा-2000
5 हुंडा विरोधी कायदा -१९६१
6 माहिती अधिकार कायदा -२००५
७ अपंग समवेशीत शिक्षण हक्क कायदा -१९९०

अशा अनेक नव्या कायद्यांविषयी शैक्षणिक नेतृत्वाला सजग राहून तत्परतेने कार्यवाही करणे अपेक्षित असते. याशिवाय तंबाकू मुक्त शाळा, प्लॅस्टिक मुक्त शाळा, कॉपी मुक्त शाळा, व्यसनमुक्त शाळा अशा अशी अनेक अभियाने वेळोवेळी राबवावी लागत असल्याने यापुढील काळात शैक्षणिक नेतृत्वाचा कायदेविषयक सजगता हा महत्वाचा गुण ठरणार आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता आगामी काळात शैक्षणिक नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीला पारंपरिक नेतृत्व संकल्पना सोबत काळसुसंगत बदल आत्मसात करणे अत्यावश्यक ठरणार आहे. हे बदल शैक्षणिक नेतृत्वाला अग्रणी राहण्यास पूरक ठरतील आणि त्याचे शिक्षण प्रक्रियेतील स्थान बळकट करण्यास मदत करतील.

शैक्षणिक नेतृत्व या संदर्भात पारंपरिक दृष्टीकोन बदलून जुन्या नव्यांची सांगड घालत बदलत्या काळानुसार नवे संदर्भ, शैक्षणिक संदर्भ व शिक्षण क्षेत्रापुढील नवे प्रश्न याचा साकल्याने विचार करत नवे नवे दृष्टीकोन स्वीकारणे का गरजेचे

आहे? याचा विचार या संशोधनात केलेला असून शिक्षण क्षेत्रातील बदलते कायदे, नवी आव्हाने, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० तसेच ऑनलाइन शिक्षणाची गरज, फायदे तोटे, नेट व मोबाईल हातात आल्याने वाढलेल्या भावनिक व मानसिक समस्या व त्यावरील उपाय यांचा विचार यात केलेला आहे.

**3. चर्चा :**

प्रागतिक दृष्टीकोन स्वीकारणे हे नव्या शैक्षणिक नेतृत्वासाठी अत्यावश्यक बनले असून त्यासाठी बदल स्वीकारत नव्या युगाचे नवी ध धोरणे माहिती करून घेत सकारात्मक बदल घडवत स्वत व आपल्या शिक्षण संस्थेला पुढे नेणे गरजेचे ठरणार आहे. पारंपरिक जुन्या विचारांना चिकटून राहिलेले नेतृत्व यापुढे टिकू शकणार नाही किंवा शिक्षण क्षेत्रात पुढे जाऊ शकणार नाही . कालानुरूप बदल आणि नव्या बदलांचा अभ्यास हेच नव्या शैक्षणिक नेतृत्वाचे बलस्थान ठरणार असून शिक्षण नेतृत्वाची नवी दिशा कशी असावी या बाबत या संशोधनात चर्चा करण्यात आली आहे .

**संदर्भसूची :**

1. शिक्षण संक्रमण मासिक , पुणे -जानेवारी २०२३
2. शिक्षण गाथा त्रैमासिक , पुणे— नोव्हेंबर २०२३
3. शिक्षण विषयक विविध कायदे – महाराष्ट्र शासन राजपत्र
4. माध्यमिक शाळा संहिता - नाशिक लॉ हाऊस - २००३सस
5. मेंदूचा पासवर्ड - लेखिका- श्रुती पानसे -२००४
6. मनोगती - डॉ. आनंद नाडकर्णी - २०१० - मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस
7. जे. कृष्णमुर्ती शिक्षण विचार – लेखक – हेरंब कुलकर्णी – मनोविकास प्रकाशन ,पुणे
8. www.msbshse.ac.in
9. www.snehalaya.org
10. www.healthymind.org